महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : rnpune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/बाउप्र/२०२२/ ५११ दिनांक 01 FEB 2022

प्रति,

प्राचार्य / संचालक / उपसचिव,
सर्व शासकीय संस्था / कार्यालय.

**विषय : कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर मर्यादित कालावधीसाठी स्थगित करणेबाबत..**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक समय २०२०/ प्र.क्र.३१/१८/(र.वका.), दिनांक ३१ जानेवारी, २०२२.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कोरोना विषाणूच्या " ओमायक्रॉन " व्हेरियंटमुळे रुग्ण वाढीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमधील बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर सद्य:स्थितीत संदर्भित आदेशाच्या दिनांकापासून दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत स्थगित करण्यात आलेला आहे. (सोबत सदर शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.)

तरी सदर कालावधीत अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयातील / संस्थेतील उपस्थिती हजेरी पटावर नोंदविण्यात यावी.

तसेच संस्थेत / कार्यालयात कोविड १९ साथरोगाचा प्रसार रोखण्याचे दृष्टीने सोशल डिस्टंसिंग, फेस मास्क परिधान करणे, सॅनिटायझेशन इत्यादीबाबत मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करणे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय
म्हणून बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर
मर्यादित कालावधीसाठी स्थगित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३१/१८(र.वका.)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३१ जानेवारी, २०२२.

वाचा :- शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ०५ जानेवारी, २०२२ चे परिपत्रक.

शासन परिपत्रक:-

कोरोना विषाणूच्या "ओमायक्रॉन" व्हेरियंटमुळे होणा-या रुग्णवाढीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उपरोक्त परित्रकान्वये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर दिनांक ३१ जानेवारी, २०२२ पर्यंत स्थगित करण्यात आला आहे.

२. कोरोना विषाणूंच्या (कोविड-१९) व ओमायक्रॉन विषाणूच्या संसर्गाच्या सध्याच्या परिस्थितीचा विचार करता मंत्रालय व नवीन प्रशासकीय इमारत तसेच राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमधील बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत स्थगित करण्यात येत आहे. सदर कालावधीत उपरोक्त दिनांक ०५ जानेवारी, २०२२ च्या शासन परिपत्रकामधील सूचनांनुसार अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयातील उपस्थिती हजेरी पटावर नोंदविण्यात यावी. यासंदर्भात प्रशासकीय विभाग व क्षेत्रीय कार्यालयांतील आस्थापना शाखांनी आवश्यक ती उपाययोजना करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२२०१३११७०५२२२१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Indra Mallo
Digitally signed by Indra Mallo
DN: c=IN, o=Personal,
2.5.4.20=92b852624baa852a6d07acef786c78e703b2b218958e8c1932
32b28a89b6cf9a, postalCode=400021, st=Maharashtra,
serialNumber=ecae14ed1e3640fe493f5246d6381f68a38e035898 70d4
67c9bac54f641fcf32, cn=Indra Mallo
Date: 2022.01.31 17:07:32 +05'30'

(इंद्रा मालो)
सचिव (प्र.सु.,र. व का.)

प्रत :

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.